१९८१ च्या महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम ५६ अन्वये विशेष वेतन मंजूर करणे.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्र. एसपीवाय- ११८३/४२४७/(२७४०)/इ-२
मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २८/३/१९८३.

: परिपत्रक :

१९८१ च्या महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम ५६ व सदर नियमाच्या परिशिष्ट १ मधील क्रमांक १४ प्रमाणे उपजिल्हाधिकारी यांना अतिरिक्त कार्यभार धारण केल्याबद्दल विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहेत. व ते अधिकार सदर परिशिष्टातील स्तंभ ७ मधील अभिप्रायास अधिन राहून त्यातील मर्यादेपर्यंत दिलेले आहेत. वरील अधिकारात ज्याच्या प्रकरणीं विशेष वेतन आयुक्तांना मंजूर करता येत नाही, अशा प्रकरणात प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी आयुक्तांकडून पाठविले जातात. परंतु त्यामध्ये पुढील सर्व मुद्दयांवरील माहिती दिली जात नाही आणि ती माहिती मागविण्यात कालापव्यय होतो.

१) अतिरिक्त कार्यभार रजा राखीव उपजिल्हाधिकारी यांना का देता आला नाही.

२) अतिरिक्त कार्यभाराच्या कालावधित केलेले काम.

३) अतिरिक्त कार्यभार हस्तांतरणाच्या प्रती व तसा कार्यभार धारण करण्यासंबंधी आयुक्तांनी काढलेल्या आदेशाची प्रत.

४) अतिरिक्त कार्यभारासाठी विशेष वेतन देण्यास पूर्वी मंजुरी दिलेली नाही व त्यासंबंधी विशेष वेतन देण्यात आलेले नाही असे प्रमाणपत्र.

५) विशेष वेतनाचा प्रस्ताव उशिरा सादर करण्यात आला असेल तर विलंबाची कारणे.

६) जरी अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी ६ महिन्याहून अधिक काळाचा असेल तर त्याची कारणे काय.

तेव्हा आयुक्तांना विनंती करण्यात येते की, अतिरिक्त कार्यभारासाठी विशेष वेतन मंजूर करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करताना यात वरील सर्व मुद्दयांची माहिती असेल याची खात्री करूनच प्रस्ताव सादर करावेत. म्हणजे माहिती मागविण्यात होणारा कालापव्यय टळेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
2 APR 1983
शाखा-

1234/115

2/4/1983

भा. गो. पोंक्षे